## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४५९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०६/२०१७

**१) अवैधरित्या बिना पास परवाना रेती वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद .:-**

दिनांक २०/०६/२०१७ चे ०१.३० वा. दर. यातील आरोपी क्र. १ याने आरोपी क्र. २ मालक यांचे सांगनेवरून आपले ताब्यातील ट्रॅक्टर क्र. एमएच ३६/७२८० चे ट्रॉली मध्ये १ ब्रास रेती किंमती १०००/रू. अवैधरित्या बिनापास परवाना चोरीची रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आल्याने सरतर्फे सपोनी पोटे स्थागुशा भडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन समान उदिष्ट साध्य करण्यासाठी धक्काबुक्की व मारहान करून त्यांचे जवळील मुद्देमाल जबरीने हिसकावुन नेल्याने गुन्हा नोंद .:-**

दिनांक १९/०६/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील दोन्ही लोकसेवक हे तपास करून डोंगरी बु. व पवनारखारी येथुन पो.स्टे. ला परत येत असतांनी यातील आरोपीतांनी समान उदिष्ठ साध्य करण्यासाठी गैरकायदयाची मंडळी एकत्र जमा करून यातील दोन्ही लाकसेवक फिर्यादी यांचे कपाळावर व पो.शि. राहुल गिन्हेपुंजे बन. १०४४ पो.स्टे. गोबरवाही याला खरचटला मार लागुन धक्का बुक्की करून मारहान केली त्याचे जवळील १ सॅमसंग कंपनीचा मोबाईल किंमती १४,०००/रू. १ एचएटी कंपनीची घडयाळ किंमती १०००/रू. एक सॅमसंग कंपनीचा डुएल मोबाईल किंमती १०००/रू. असा एकुन १६,०००/रू. चा मुद्देमाल जबरीने हिसकावुन नेल्याने फिर्यादी स.फौ. मुलचंद मेश्राम वय ४८ वर्ष, रा. गोबरवाही यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३४१,३५३,३९५,३२४,३२३,१४३,१४७,१४९,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. झोटींग पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन घरासमोर ठेवलेली गिट्टी उचलण्याच्या कारणावरुन भांडण, शिवीगाळ करुन कुऱ्हाडीचे दांडयाने डोक्यावर मारुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद .:-**

**अ)** दिनांक १९/०६/२०१७ चे १८.०० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे घरासमोर ठेवलेली गिट्टी उचलने वरुन भांडण करुन शिवीगाळ केली व आरोपी क्र. १ नी फिर्यादीचे पती केवळराम नंदनवार तसेच मुलगा अशोक नंदनवार यांचे डोक्यावर कुऱ्हाडीचे दांडयाने मारुन दुखापत केल्याने फिर्यादी सौ. कमला बाई केवळराम नंदनवार वय ६० वर्ष, रा. चिचोली यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १९/०६/२०१७ चे १८.०० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी व तिचे मुला सोबत घरासमोर ठेवलेली गिट्टी उचलने वरुन भांडण करुन फिर्यादीचे पती चरण सोनटक्के यांचे डोक्यावर आरोपी क्र. २ ने काठीने मारुन दुखापत केल्याने फिर्यादी सौ. सौ. प्रमीला चरण सोनटक्के वय ५० वर्ष, रा. चिचोली यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**४) समोरील दाराचा ताला तोडुन ड्रेसींग टेबलचे ड्रावरमधील सोन्या चांदीचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी .:—**

दिनांक १९/०६/२०१७ चे १९.०० वा ते २०/०६/२०१७ चे ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी हा आपले घराचे दाराला कुलुप लावुन रात्री परिवारासह बाहेर गावी गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेल्या ड्रेसींग टेबलच्या ड्रावर मधील १ सोन्याचे मंगळसुत्र ४.५ तोडे, १ सोनयाचा लक्ष्मी हार २६ ग्रॅम, सोन्याच्या ३ अंगठया १ ग्रॅम, काळी गळसुली ज्यात ४ सोन्याचे मणी, १ सोन्याचा डोरला ४ ग्रॅम, चांदीचा कळा ३ तोडे, चांदीच्या पायपट्या १ तोडा, व नगदी १,५००/—रु. असा एकुण १,९९,०००/—रु. चोरुन नेल्याने फिर्यादी दशरथ कंळबे वय ३६ वर्ष, रा. लाखांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. लाखडे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**५) कार चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकांस धडक मारुन जखमी केल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक २०/०६/२०१७ चे १६.०० वा. दर. यातील आरोपी अज्ञात कार चालकाने आपले ताब्यातील वाहन वेगाने, निष्काळजीपणे चालवुन डांबरी रोडने जाणाऱ्या राहुल साखरकर वय २५ वर्ष, रा. मिटेवाणी यांचे मोटार सायकला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने सु. बो दवाखाना तुमसर येथुन प्राप्त एमएलसी रिपोर्ट व चौकशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १३४ (अ) (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**६) अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक २०/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, जवाहरनगर, कारधा व पवनी येथे अवैध देशी दारु/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४८ लिटर हातभट्टी दारु+ १४०किलो सडवा+ साहित्य किंमती २६३३०/—रु, ३ लिटर ७८० मिली लिटर देशी+ विदेशी दारु+ १ मोबाईल + १ बॅग किंमती ५१०५/—रु. तसेच जुगारातुन किंमती ३१२ /—रु. असा एकुण किंमती ३१,७४७/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

सपोनी. अे.टी. सुनगार
नियंत्रण कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र ९८२३१२३३३६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.